# अर्थपूर्ण

फेब्रुवारी २०१३।₹३०
पुणे, वर्ष ३, अंक ०२

**आर्थिक साक्षरता + पारदर्शकता = स्वाभिमानी भारत**



# सोन्याचा शर्ट!
## निर्लज्ज कृतींचे पेव

- सोने 'भाव' खाणार?
- फायदा देणारा शेअर बाजार
- बँकिंग कायद्यातील बदल
- कसे असेल २०१३?
- आपलेच सण, आपलेच धन
- करबचतीची मोहीम

# अर्थपूर्ण

फेब्रुवारी २०१३

वर्ष तिसरे
अंक दुसरा



संपादक
**यमाजी मालकर**
**संपादन साहाय्य : सम्राट शिरवळकर**
editor.arthapurna@gmail.com

**'अर्थपूर्ण' पब्लिकेशन्स प्रा. लि.**
१०४ निलगिरी अपार्टमेंटस्, दुसरा मजला,
कर्वे रस्ता, कोथरूड, पुणे - ४११०३८
**फोन : ०२० - ३२६००९९६**
www.arthapurna.org



**डिझाईन**
ऑफबीट कॉन्सेप्टस्,
पुणे ९८८१०९८०१०

**मुद्रितशोधन :** विजय जोशी



**जाहिरात आणि प्रसिद्धी**
हाऊस ऑफ सक्सेस,
१ पॅपिलॉन, कर्वे स्त्री शिक्षण
संस्थेसमोर,कर्वेनगर,
पुणे-४११०५२
फोन ०२०-६४७०३६१५
advt.arthapurna@gmail.com


**वार्षिक वर्गणीदारांसाठी सूचना**

'अर्थपूर्ण' आपल्यापर्यंत वेळेत पोचावा, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत; मात्र पोस्टातील तांत्रिक अडचण किंवा अपुऱ्या पत्त्यामुळे तो आपणापर्यंत वेळेत पोचत नाही. आपणास अंक मिळाला नाही तर महिन्याच्या अखेरपर्यंत कळवावे, तो अंक आम्ही पुन्हा पाठवू.

- पत्त्याच्या स्लीपवर आपला वर्गणीचा कालावधी दिला आहे. तो संपला असेल तर वर्गणी त्वरित भरावी, ही विनंती. (वार्षिक वर्गणी रु. ४००/- पुण्याबाहेरील धनादेश रु. ४५०/-)

वार्षिक वर्गणी व टपालासंबंधी व्यवहारासाठी संपर्कः
**०२०-३२६००९९६**
**९९२३३३९९३३**
arthapurna.monthly@gmail.com


'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या साहित्य आणि विचारांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'अर्थपूर्ण'मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील मजकुराची सत्यता पडताळून आणि योग्य शहानिशा करूनच वाचकांनी जाहिरातीबाबत कोणतेही व्यवहार करावेत. जाहिरातीत केलेल्या दाव्यांबाबत 'अर्थपूर्ण' कोणत्याही प्रकारची हमी घेत नाही.


# अनुक्रमणिका


**०४ निर्लज्ज कृतींचे पेव ...**यमाजी मालकर

**०६ सोने आयात एक राष्ट्रीय संकट...**एस. एस. यादव

**१० गोल्ड मनी ...**प्रा. मनोज पांडकर

**१४ सोन्याने केला घात...**भारतीय

**१६ सोने 'भाव' खाणार? ...**यशराज

**१८ नाहीत ते वेडे, जे सुवर्णवेडे...**रवींद्र तांबोळी

**२० बँकिंग कायद्यातील बदल आत्मघातकी ...**देविदास तुळजापूरकर

**२२ गॉगल पलीकडचा चंद्र...**चंद्रशेखर टिळक

**२४ वयानुसार बदलते अर्थकारण....**प्रसाद मिरासदार

**२८ संक्रांत- रथसप्तमी ...**विजय तरवडे

**३० 'स्टेप डाऊन क्लॉज' आणि 'रोखे' ...**आरूष

**३४ आयकर नियोजनाद्वारे करबचत ...**सदानंद ठाकूर

**३६ निश्चित फायदा देणारा शेअरबाजार !...**संदीप भालचंद्र साठे

**३८ कार्डः क्लोनिंग, स्किमिंग, हायजॅकिंग ...**वंदना धर्माधिकारी

**४० 'अनक्लेम्ड 'चा उतारा...**गिरीश गंगाधर धर्माधिकारी



'अर्थपूर्ण' हे मासिक मालक, अर्थपूर्ण पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्याकरिता **मुद्रक व प्रकाशक यमाजी मालकर** यांनी विक्रम प्रिंटर्स प्रा. लि. ३१,३४ पर्वती इंडस्ट्रीयल इस्टेट, पुणे-सातारा रस्ता, पुणे ९ येथे छापून ए-७०२,साम्राज्य, शिवतीर्थनगर, पौड रस्ता, पुणे ४११०३८(सुतारदरा बसथांब्याजवळ) येथे प्रसिद्ध केले. **संपादक : यमाजी मालकर**

# निर्लज्ज कृतींचे पेव



**यमाजी मालकर**
ymalkar@gmail.com

**सत्ता-संपत्तीचे प्रदर्शन करण्याचा निर्लज्जपणा करण्यातच आमच्यातले काही धन्यता मानतात, कारण त्यापलीकडे त्यांना आज काही दिसत नाही. त्यांना ग्लानी आली आहे. मात्र जेव्हा स्वत:तील आणि देशातील ही विसंगती त्यांच्यासमोर राक्षस म्हणून उभी राहील आणि आज बळी जाण्याची पाळी तुझी आहे, असे बजावेल, तेव्हा फार उशीर झालेला असेल.**

गुंतवणूक म्हणून सोने घ्यायचे की नाही, हा मोठाच पेच निर्माण झाला आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचा विचार करायचा तर सोने अजिबात बाळगू नये, अशी आजची परिस्थिती आहे आणि स्वत:चा विचार केला तर गुंतवणूक म्हणून सोन्याला गेली काही वर्षे चांगला परतावा मिळाला आहे. शिवाय आमची सोन्यात भावनिक गुंतवणूक आहे, ती वेगळीच. सोन्याच्या आयातीसाठी खर्च कराव्या लागणाऱ्या परकीय चलनामुळे सरकार जेरीस आले आहे. आयात-निर्यात व्यापारातील तूट वाढत चालल्याने डॉलर जास्त खर्च होताहेत म्हणजे आमच्या देशाच्या तिजोरीतील परकीय चलनाच्या साठ्याला गळती लागली आहे. दररोज हजारो मोटारी रस्त्यावर येत आहेत आणि देशाचे तेलावरील बजेट वाढतच चालले आहे. त्यासाठी डॉलर मोजणे तर भागच आहे. परकीय कर्जाचे हप्ते चुकविलेच पाहिजेत. त्यासाठी डॉलरच लागतो. आधुनिक तंत्रज्ञान विकसित देशांकडून डॉलरमध्येच घ्यावे लागते. सोन्याचे उत्पादन देशात होत नाही, मात्र त्याला इतकी मागणी आहे की त्यावर डॉलर खर्च करण्याशिवाय पर्याय नाही. आयात शुल्क वाढवून सोने महाग करण्याचा एक मार्ग होता, मात्र सोन्याच्या व्यवहारात हितसंबंध असणाऱ्यांचा त्याला विरोध होतो आहे. मग देशाने करायचे तरी काय? असा हा पेच आहे.

या पेचप्रसंगातून आणि देशातील गेल्या काही दिवसांतील घटनांवरून निष्कर्ष एकच निघतो, तो म्हणजे भारताला आपला प्राधान्यक्रम ठरवावाच लागेल. दररोज अशा काही विसंगती समोर येत आहे की त्यांच्यासह जगणे देशावर प्रेम करणाऱ्या खऱ्या भारतीय नागरिकाला कठीण व्हावे. कोणाच्या देशभक्तीची कसोटी घेण्याचा अधिकार आपल्याला कोणी दिला नाही, पण म्हणून संपत्ती प्रदर्शनांची ही स्पर्धा उघड्या डोळ्याने पाहत बसावी, हेही न पटणारे आहे. भारतीय लोकशाहीने आपल्याला पाहिजे तेवढी संपत्ती बाळगण्याचा अधिकार प्रत्येक नागरिकाला दिला आहे. त्यामुळे सार्वजनिक जीवनात वाढत चाललेले संपत्तीचे निर्लज्ज प्रदर्शन बेकायदेशीर ठरत नाही, हे मान्य. पण भुकेल्या माणसांना वाकुल्या दाखवत त्याच पंक्तीत पंचपक्वान्नाचे ताट घेऊन 'मी माझ्या बापाचे किंवा माझे खातो', ही मुजोरी माणुसकीच्या राज्यात निर्लज्ज कृती ठरते. अशा निर्लज्ज कृतींचे देशात पेव फुटले आहे.

सोन्याचे कपडे शिवणे, अंगावर सोन्याच्या दागिन्यांचे वजन मिरविणे, लग्नकार्यात वारेमाप खर्च करणे, लाड म्हणून मुलांच्या हातात वाटेल तेवढा पैसा आणि वस्तू देणे, हॉटेलमध्ये खूप अन्न ताटात घेऊन ते वाया घालविणे, कर भरतो म्हणून पाण्याची आणि विजेची नासाडी करणे, गरज नसताना महागडे पेट्रोल उडविणाऱ्या गाड्या पळविणे, संपत्तीच्या जोरावर नैसर्गिक साधनसंपत्तीची नासाडी करणे, समाजाकडे पाठ फिरवून व्यक्तिस्वातंत्र्याचा अतिरेक करणे या आणि यांसारख्या अनेक कृती आपल्या देशासाठी निर्लज्ज कृती आहेत.




पैशीकरणामुळे त्या करण्याची आपल्या समाजात जणू स्पर्धाच लागली आहे. एकीकडे देशप्रेमाच्या आणाभाका घ्यायच्या आणि दुसरीकडे ज्या बहुजनांच्या जगण्यातून हा देश बनला आहे, त्यांच्या जगण्याला कवडीमोल ठरवायचे, असा हा दुटप्पीपणा आहे. याच्या मुळाशी सत्ता संपत्तीची जी मुजोरी आहे, ती ठेचण्याची गरज निर्माण झाली आहे.

कसे जगावे, हे जगाला सांगणारे तत्त्वज्ञान भले या देशाने दिले असेल, आज मात्र त्या तत्त्वज्ञानाचा आपल्याच देशात पराभव पाहायला मिळतो आहे. राज्यघटनेतील स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तत्त्वांचा उच्चार आज अतिशय क्षीण झाला आहे. सत्ता-संपत्तीच्या मुजोरीने जणू देशाला वेठीस धरले आहे. या मगरमिठीतून सुटण्याचा काही मार्ग आहे काय?

एक मार्ग आहे. देशाकडे येणाऱ्या आणि देशातील नागरिकांनी कष्ट करून तिजोरीत भरलेल्या पैशांचे व्यवस्थापन. ज्याच्या अभावी आणि ज्याच्या अतिरेकाने देशाची मानसिकता बकाल करून ठेवली आहे, त्याचे व्यवस्थापन. ज्या पैशांनी आमची नाती, आमचे कौटुंबिक संबंध, आमची गावे, आमची शेती, आमचे धर्मपंथ, आमची संस्कृती आणि आमचे भावविश्वही हिसकावून घेतले आहे, त्या पैशांचे व्यवस्थापन. भारतीय समूहाच्या म्हणजे आपल्या वृत्तीविषयीची सभा-समारंभामध्ये चाललेली पोपटपंची त्यासाठी बंद करावी लागेल आणि माणूस दोषी नसून व्यवस्था दोषी आहे... म्हणून तिच्याविषयी आणि तिच्यात करावयाच्या बदल किंवा दुरुस्तीविषयी बोला, असे विचारवंतांना बजावावे लागेल. एके काळी देशाकडे पैसाच कमी होता, आज देशाकडे प्रचंड पैसा आहे. पण तो नेमके काय निर्माण करणार आहे, असे मुळातले प्रश्न त्यासाठी त्यांना आणि राजकीय आणि सामाजिक नेत्यांना विचारावे लागतील. सत्ता-संपत्तीचे प्रदर्शन करण्याचा निर्लज्जपणा करण्यातच आमच्यातले काही धन्यता मानतात, कारण त्या पलीकडे त्यांना आज काही दिसत नाही. त्यांना ग्लानी आली आहे. मात्र जेव्हा स्वत:तील आणि देशातील ही विसंगती त्यांच्यासमोर राक्षस म्हणून उभी राहील आणि आज बळी जाण्याची पाळी तुझी आहे, असे बजावेल, तेव्हा फार उशीर झालेला असेल. ■

**भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये सोन्याच्या आयातीने जो गोंधळ घातला आहे, तो 'अर्थपूर्ण' च्या या अंकात पाच विशेष लेखातून आपण समजून घेणार आहोत. सोन्याची आयात राष्ट्रीय संकट आहे की उत्तम गुंतवणूक आहे, हे तर आपल्याला समजेलच, पण अर्थव्यवस्थेतील गोंधळही लक्षात येईल. इतर गुंतवणुकींचा परतावा वाढत नाही, तोपर्यंत सोन्याची सुरी पोटात खुपसून घेण्याशिवाय पर्याय नाही तर !**